"भल्या पहाटे"

भल्या पहाटे मनांत दाटे;
क्षणात उमले विश्व नवे –
विसावलेल्या स्वप्नामागे
सुसाट धावे अश्व नवे,

चराचरातून घराघरातून
बहरुन येते ओज नवे –
दिक्कालाच्या श्वासावरचे
चमचमणारे तेज नवे,

काळपुरुष नि नियती यांचे
खट्याळ सारे खेळ नवे –
अति-रतीच्या लहरींवरती
चिरंतनास्तव मेळ नवे,

आणि डंवरते छंदे पालवी,
खलता कांटे फूल नवे –
ओजस्विमय जग उलतांना
नव्या मनूचे मूल नवे,

काळोखाच्या कुशीस जेंव्हा
फडफडणारे पंख हवे –
अर्द्वैताचा ध्वनि त्यातुनि
नित्य पल्लवी बिंब नवे.

२०।३०।७ सहदेव मरवामले.